
10 FEB 2026

पुढारी

# कुलगुरूपदाच्या अर्ज छाननीची प्रक्रिया सुरू


**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी आलेल्या ११५ उमेदवारांच्या अर्जाच्या छाननीस सोमवारपासून सुरुवात झाली. मंगळवारी अर्ज छाननीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.



कुलपती कार्यालयाने कुलगुरूपदासाठी २७ जानेवारीपर्यंत उमेदवारांकडून अर्ज मागवले. शेवटच्या दिवसापर्यंत ११५ जणांनी कुलगुरू पदासाठी अर्ज भरले. मंगळवारपर्यंत (दि. १०) अर्जांची छाननीची प्रक्रिया चालणार आहे. त्यानंतर पात्र उमेदवारांची कच्ची यादी जाहीर होऊन त्यावर हरकती मागवल्या जातील. हरकती व शंकांचे निरसन करून अंतिम यादी जाहीर होईल. त्यानंतर निवड समितीकडून मुलाखतीची प्रक्रिया पार पडणार आहे. त्यातून पाच उमेदवारांची नावे अंतिम केली जातील. पाच पात्र उमेदवारांच्या राज्यपाल मुलाखती घेऊन एकाची 'कुलगुरू' म्हणून निवड जाहीर करतील.

10 FEB 2026
पुण्यनगरी




कोते : आदिवासी आश्रमशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. सुधीर कुंभार. मंचावर जगन्नाथ दराडे, डॉ. श्रीकृष्ण महाजन व अविनाश भाले.

# पर्यावरण वाचले तरच माणूस वाचेल : डॉ. सुधीर कुंभार

## कोते आदिवासी आश्रमशाळेत विद्यापीठाचा स्कूल कनेक्ट उपक्रम

**कोल्हापूर :** निसर्ग वाचवणे हे आपले कर्तव्य आहे. पर्यावरण वाचले, तरच माणूस वाचेल, म्हणून पर्यावरण समजून घेणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन पर्यावरण अभ्यासक डॉ. सुधीर कुंभार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने कोते (ता. राधानगरी) येथील शासकीय आश्रमशाळेत आदिवासी आश्रमशाळा स्कूल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत 'वैज्ञानिक दृष्टिकोन आणि पर्यावरण' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. केंद्राचे समन्वयक डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते. डॉ. कुंभार म्हणाले, वणवा पेटवू नका, वणवा लागला तर तो कसा आटोक्यात आणायचा, हे शिकून घ्या. वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासा. सर्प शेतकऱ्यांचा मित्र आहे, त्यांना मारू नका. झाडे लावून जगवली पाहिजेत. यावेळी सीड बॉल्स, तसेच गांडूळ खत तयार करण्याची प्रक्रिया, जलसंवर्धनाची प्रक्रिया त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. यावेळी अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक जगन्नाथ दराडे यांनी आभार मानले. यावेळी आश्रमशाळेतील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

10 FEB 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी विविध ६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ५ परीक्षा केंद्रांवर पार पडल्या. या परीक्षांसाठी २११ विद्यार्थी उपस्थित होते, तर दिवसभरात ५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल लावण्यात विद्यापीठाच्या परीक्षा विभागाला यश आले आहे.